ISSN 2231-2137

# CONTEMPORARY RESEARCH IN INDIA

A Peer-Reviewed Multi-Disciplinary International Journal
UGC Approved Journal No. 62441, NAAS Score 2018 : 3.23
Impact Factor 2016 : 0.956 (GIF)



ॐ श्री

श्री भारत शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

माऊली महाविद्यालय, वडाळा ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर (महाराष्ट्र) व विद्यापीठ अनुदान आयोग आयोजित

—— एक दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र ——

## ॥ संत साहित्याचे योगदान ॥

विशेष अंक

संत तुकाराम बिज, शनिवार ३ मार्च २०१८











## CONTENTS


| Sr. No. | Title of the Article | Page No. |
|---|---|---|
| 1 | भक्ती परंपरेतील स्त्री साहित्याचे योगदान<br>प्रा. डॉ. असिया चिश्ती | 01 |
| 2 | संत साहित्य : सर्वांगी स्पर्श करणारे तत्त्वज्ञान<br>डॉ. प्रदीप औजेकर | 04 |
| 3 | 'संत एकनाथांचे साहित्यातील योगदान: एक दृष्टीक्षेप'<br>प्रा. सौ. सुवर्णा वैभव यमगर | 06 |
| 4 | महाराष्ट्रातील सूफी आणि दत्त संप्रदायाचे वाङ्मयीन योगदान<br>प्रा. टकले गणेश प्रल्हादराव | 09 |
| 5 | ''संत साहित्यातील विश्वात्मकता' व सर्वधर्मसमभाव...!''<br>प्रा. डॉ. मधुकर गणेश मोकाशी | 11 |
| 6 | ''संत साहित्यातील सामाजिक मूल्ये''<br>प्रा. पसरकल्ले एस. पी. | 14 |
| 7 | संत जनाबाई यांच्या अभंगातील सामाजिक दृष्टिकोन व वाङ्मयीन वैशिष्ट्ये<br>प्रा. परमेश्वर हटकर | 16 |
| 8 | महाराष्ट्रातील भक्ती चळवळीचे योगदान<br>डॉ. रमेश शिंदे | 19 |
| 9 | संत साहित्य आणि समाज प्रबोधन<br>डॉ. जनार्धन परकाळे | 22 |
| 10 | भक्तीपरंपरेतील स्त्रीसाहित्याचे योगदान<br>श्री. डॉ. अनिल बांगर, | 24 |
| 11 | संत साहित्य आणि समाजप्रबोधन<br>प्रा. डॉ. नवनाथ दणाणे | 27 |
| 12 | ''संत साहित्यातील संत कवयित्रींच्या रचना–एक अभ्यास''<br>प्रा. व्यवहारे एस. टी. | 30 |
| 13 | संत कवयित्री - निर्मळाबाई<br>प्रा. सोनवले राजकुमार रंगनाथ | 33 |
| 14 | संत एकनाथांचे सामाजिक कार्य<br>श्री. सुहास बापू मोरे | 35 |
| 15 | संत साहित्याच्या निर्मिती प्रेरणा<br>प्रा. सौ. स्वाती माने-थिटे | 37 |
| 16 | संतसाहित्यातील भाषिक व मुल्यविचार : संशोधन संधी<br>प्रा. नानासाहेब महादेव गव्हाणे | 40 |
| 17 | वारकरी संप्रदायातील स्त्रियांचे योगदान<br>भागवत लहुबुवा ढोले | 42 |
| 18 | संत साहित्याची सार्वकालिकता<br>डॉ. दत्तात्रय महादेव डांगे व डॉ. विद्या विजय नावडकर | 44 |
| 19 | **मराठी भाषेचे नवनीत – समग्र तुकाराम**<br>**श्री. अनिलकुमार राजाराम पाटील** | 47 |
| 20 | सुधारणावादी पुरोगामी संत : गाडगेबाबा<br>प्रा. डॉ. लहू वाघमारे | 48 |
| 21 | संत साहित्यातील जातीयता...<br>प्रा. गौतम गायकवाड | 52 |
| 22 | सांस्कृतिक पर्यावरण आणि मध्ययुगीन स्त्रीवादाचे चित्रण<br>प्रा. डॉ. दत्तात्रय प्रभाकर डुंबरे | 56 |
| 23 | "नाथांचा धर्म आणि साहित्यातून समाज प्रबोधन"<br>प्रा. डॉ. अनिता प. खंडागळे | 61 |

| | | |
|---|---|---|
| 48 | संत तुकारामांच्या अभंगातील विविध रुपे<br>प्रा. डॉ. रामलीला सुदामराव पवार | 124 |
| 49 | संत तुकारामांचे चिरंतन जीवन चिंतन<br>डॉ. रवींद्र वैजनाथराव बेम्बर | 128 |
| 50 | "महात्मा बसवेश्वरांचे स्त्री उध्दाराचे कार्य"<br>प्रा. संगिता बावगे - ब्याळे | 131 |
| 51 | संतसाहित्याची भूमिका आणि अभ्यास<br>प्रा. डॉ. संजय कुलकर्णी | 133 |
| 52 | ''संत तुकाराम: साहित्य व सामाजिक प्रबोधन''<br>प्रा. डॉ. संतोष तुकाराम कदम | 135 |
| 53 | संत तुकारामांचे मानवी जीवनातील महत्त्व<br>प्रा. सौ. शिल्पा अश्विनकुमार पाटील | 137 |
| 54 | संत ज्ञानेश्वर : शोध आणि बोध<br>शिरशीकर माधुरी मुकुंदराव | 139 |
| 55 | 'साक्षात्कारी संतकवी माणकोजी बोधले'<br>प्रा. शुभदा शिवपूजे - उपासे | 141 |
| 56 | मुस्लिम संत कवींचे योगदान<br>डॉ. सुकुमार दादू आवळ | 143 |
| 57 | नामदेवांची उपदेषवाणी<br>डॉ. लक्ष्मण बळीराम थिट्टे | 145 |
| 58 | 'संत साहित्य आणि समाज प्रबोधनः एक अभ्यास'<br>प्रा. डॉ. उन्मेश भोकडे | 147 |
| 59 | मराठी संत साहित्याच्या निर्मिती प्रेरणा<br>प्रा. डॉ. विजय रेवजे | 150 |
| 60 | भारतीय साहित्यात गोमंतकीय संताचे योगदान<br>प्रा. विनय मड्गांवकर | 152 |
| 61 | संत साहित्यातील स्त्री आत्मकथने<br>डॉ. सुवर्णा गुंड - चव्हाण | 155 |
| 62 | संत ज्ञानेश्वर यांच्या अभंगातून प्रकट झालेला जीवनानुमव<br>प्रा. राजकुमार नागनाथ नवले | 158 |
| 63 | दत्त संप्रदायाची साहित्य चळवळ आणि समाज परिवर्तन<br>प्रा. एन.व्ही. षिंद | 161 |
| 64 | कृषीतज्ञ संत तुकाराम<br>प्रा. डॉ. सौ. मंगल डोंगर | 163 |
| 65 | संत बोधराज महाराज (पोधल्या बुवा), आजंदेकर<br>डॉ. भटू गंगाराम वाघ | 166 |
| 66 | भक्ती परंपरेतील स्त्रीसाहित्याचे योगदान<br>डॉ. गीता सुनिल येर्लेकर | 169 |
| 67 | भक्ती परंपरेतील स्त्री साहित्याचे योगदान<br>श्री. मैरगुंडे एस.एस. | 172 |
| 68 | संत तुकारामांचे सामाजिक कार्य<br>प्रा. दामोदर दगडू बनसोडे | 175 |
| 69 | वारकरी संतांच्या अभंगातील राष्ट्रीय एकात्मता<br>प्रा. डॉ. संभाजी जाधव | 178 |
| 70 | भक्ती परंपरेतील स्त्री साहित्याचे योगदान<br>प्रा. डॉ. कविता मुरुमकर | 181 |
| 71 | संतवाणीतील सांगीतिकता (संत नामदेवांच्या अभंगवाणीच्या आधारे )<br>डॉ. एम. व्ही. कुलकर्णी | 183 |

# संत बोधराज महाराज (पोधल्या बुवा), आजंदेकर

डॉ. भटू गंगाराम वाघ, को.ए.सो. लक्ष्मी-शालिनी महिला महाविद्यालय, पेझारी, ता. अलिबाग जि. रायगड

CONTEMPORARY RESEARCH IN INDIA ISSN 2231 - 2137
Received: 12/01/2018 | Edited: 20/01/2018 | Accepted & Published: 03/03/2018

खानदेशातील आजंदे या शिंदखेडा तालुक्यातील (जि. धुळे) गावामध्ये श्री बोधराज महाराज यांचा जन्म झाला. आजंदे खुर्द हे गाव नरडाणे गावापासून अर्धेच मैल अंतरावर आहे. त्या ठिकाणी बोधराज महाराजांची समाधी आहे. संत बोधराज हे सर्वसामान्य शेतकरी कुटुंबामध्ये जन्माला आलेले होते. घरची परिस्थिती अत्यंत गरिबीची, पण त्यांनी कधी ईश्वरभक्तिमध्ये कधीही खंड पडू दिला नाही. दरवर्षी ते नेमाप्रमाणे पंढरपूरची वारी करत होते. वैशाख शुद्ध एकादशी ते पौर्णिमेपर्यंत आमळनेरच्या (जि.जळगाव) संत श्री सखाराम महाराजांच्या संस्थानामध्ये उन्हाळी उत्सवयात्रेच्या वारीला जायचे. आणि आपला शेतीचा व्यवसाय सांभाळून जगाला आध्यत्माचे मार्गदर्शन करायचे हा त्यांचा नेम होता. पंढरीचा पांडुरंग आणि रुक्मिणी हे त्यांचे दैवत. बोधराज एक साधा शेतकरी होता. धोतर, बारबंदी, डोक्याला मुंडासा असा त्यांचा पेहराव. लहानपणापासून त्यांना हरी भक्तिची गोडी होती. संसारामध्ये मन लागेना. घरातले, भाऊबंदकीतले आणि गावातले लोक त्यांना 'वेडा बोधला' म्हणत, कुणी 'पोधल्या बुवा' म्हणत, कुणी 'बोधल्या बुवा' म्हणत. पण बाबांचे मूळ नाव 'बोधराज' असे आहे. शेतीची कामे करत असतांना आषाढी-कार्तिकीचा नेम म्हणजे पंढरपूरची वारी. भगवान पांडुरंगाचा आपल्या भक्तांशी जो जो संवाद झाला, त्या विषयी अनेक आख्यायिका आहेत.

आषाढी वारी जवळ आली होती. बाबांना घरातल्या मंडळींनी बजावून सांगितले, 'या वर्षी दुष्काळी परिस्थिती आहे, भाड्याला पैसे नाहीत. पेरणीची वेळ जवळ आलेली आहे. तुम्ही पंढरपूरला वारीला जाऊ नका. या वर्षी नाही गेले, तर देव काही तुमच्यावर रागावणार नाही.' पण तरीही बाबांनी त्यांचे काही ऐकले नाही. बोधराज बाबांनी वारीला जाण्याचा निर्णय घेतला. पण घरातल्या मंडळींनी त्यांना घरामध्ये कोंडून ठेवले होते. भाबांनी परमात्म्याचा धावा केला, 'देवा, अरे हा कसला प्रपंच? हे कसले बंधन तू मला टाकले? मी तुझ्या दर्शनाला येऊ शकत नाही? आज जर माझी वारी टळली, तर मी पुन्हा तुझ्या वारीला येणार नाही. एकदा माझा परमार्थ आंतरल्यावर तुझी माझी भेट आंतरेल. तुझी माझी सेवा आंतरेल. तेव्हा भगवान पांडुरंगाने बोधराजांचे रूप घेऊन त्या बंदिशाळेमध्ये वास्तव्य केले. बोधराजांना पंढरीच्या वारी करिता बंदिवासातून मुक्त केले. पांडुरंगाच्या चरणी बाबांनी संकल्प केला होता, मी आजंदे गावाला मावंज्या भोजन करीन.

बोधराज वारी करुन आजंद्याला घरी परत आले. रब्बीचे दिवस सुरू झालेले होते. बाबांकडे पेरणीचा गहू होता, तो गहू वारकऱ्यांना वाटला गेला. घरात पेरणीकरिता गव्हाचे बियाणे नाही. कुणीतरी एका खळकुट्याने सांगितले, "बाबा, माझ्याकडे कडू भोपळ्याच्या बिया आहेत, तुम्ही आसं करा, सर्व शेतभर भोपळे लावून टाका." त्या खळकुटाण्याच्या विनोदाकडे लक्ष न देता बाबांनी त्या भोपळ्याच्या बिया घेतल्या. आणि आपल्या शेतामध्ये पेरल्या. आजंदे गाव पांढरीतली शेते गव्हाच्या पिकाने डोलताहेत. लोक कुणी गव्हाला पाणी देत आहे, कुणी हरबऱ्याला पाणी देत आहे. आणि बोधराज बाबा भोपळ्याच्या बियांना पाणी देताहेत. हिरवगार शेत बहरले आहे. एकेका झाडाला पाचपाच, दहादहा भोपळे लागले आहेत. जो तो येऊन बाबांची टवाळी करू लागला. 'हा वेडा बोधल्या, या कडू भोपळ्याचे काय करणार?' एकीकडे लोकांचे शेतात गव्हाचे, हरबऱ्याचे पिकं डोलताहेत, आणि बोधराजाचे शेत मात्र कडू भोपळ्याच्या वेलानी आणि फळांनी बहरलेले आहे. गहू कापणीचा हंगाम सुरू झाला. लोकांनी गव्हाची कापणी सुरू केली. इकडे बोधराज बाबाने लावलेले ते भोपळेही पक्वं व्हायला लागले होते. एक दिवस बाबांनी बैल-गाडी घेतली, दोन-चार मजूर सोबत घेतले म्हणाले, "चला, आपल्याला भोपळे तोडायचे आहेत." गावामध्ये बाबांची जोरदार चर्चा सुरू झाली होती. 'हा वेडा बोधल्या त्या कडू भोपळ्यांना काय करणार?' बाबांनी दहा-वीस गाडी जेवढा काही भोपळा तोडलेला होता, तेवढा खळ्यामध्ये आणून टाकला. दोनचार दिवस त्यांना चांगले वाळवू दिले. भगवान परमात्म्याचे नामचिंतन करता करता एके दिवशी सकाळी मुलाला म्हणाले, "बबन, अरे आपल्याला आज खळ्यामध्ये भोपळे काढायचे आहेत." बबन आणि त्याची आई यमाईचा बोधराज महाराजांच्या वागण्या बोलण्यावर आता संपूर्ण भरवसा होता. सर्वजण खळ्यात गेले. बाबांनी हातामध्ये विळा घेतला. पांडुरंगाचा धावा केला. आणि एका भोपळ्याला विळा मारून पाहिला, तर त्या भोपळ्यातून भराभरा गहू खाली पडायला लागले! बघता बघता शेर-दिडशेर गहू खाली पडले. बाबा म्हणाले, 'देवा पांडुरंगा, हा काय चमत्कार आहे? भोपळ्यातून गहू!' दुसरा भोपळा फोडला, तिसरा फोडला. त्यातूनही गहू पडत होते! बघता बघता वार्ता आजूबाजूच्या ग्रामस्थांपर्यंत पोहोचली. गावामध्ये एकच चर्चा झाली, 'वेडा बोधराजच्या भोपळ्यातून गहू निघताहेत!' आख्खा गाव त्या खळ्यावर जमा झाले. नुसतेच जमा झाले नाही, तर त्यांनी ते भोपळे फोडायला सुरूवात केली. असे करता करता खळ्यामध्ये गव्हाची रास लागली. आणि काय चमत्कार झाला, त्या भोपळ्यामधून भगवान पांडुरंग आणि रूक्मिणी आईची मूर्तीसुद्धा निघाली! ती आता आजंदे येथे मंदिरामध्ये भगवंताच्या चरणाजवळ पूजेला ठेवलेली आहे. बोधराज बाबांनी त्या वर्षी पंचक्रोशीतील सर्व भाविक भक्त, वारकरी, साधूसंत,





भजनी, ग्रामस्थ, नातेवाईकांना आमंत्रित करून त्या आजंदे गावामध्ये यथासांग मावंजे भोजन दिले.

कोकरमुंड्याचे अनंतस्वामी दरवर्षी अमळनेरच्या उत्सवयात्रेला जात असत. त्याआधी ते आजंद्याला यायचे. बोधराज महाराजांकडे मुक्काम करायचे आणि ते दोन्ही संत पुढे अमळनेरला उत्सववारीला जायचे. एकदा असेच ते दोन्ही संत अमळनेरच्या उत्सवयात्रेला गेले. उन्हाळाचे दिवस होते. बोरी नदीच्या पात्रामध्ये पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नसे. लोक तिथे शेवड्या खोदून पाण्याची व्यवस्था करायचे. वाडी संस्थानच्या बाजूला ब्राह्मण समाजाची भलीमोठी शेवडी खोदलेली होती. त्या शेवडीतले पाणी पिण्याकरिता व स्वयंपाकाकरिता वापरले जायचे. स्पृश्य-अस्पृश्यतेचा तो काळ होता, शिवाशिव त्या वेळेला भयंकर होती. उत्सवयात्रेला इतर समाजाच्या दुकानदारांना पाण्यासाठी नदी पात्रात वेगवेगळ्या छोट्या छोट्या शेवड्या खोदलेल्या असायच्या, त्याच्यातून ते पाणी भरायचे. दुपारी बाराची वेळ, एक सात-आठ वर्षांचे चांभाराचे पोर खेळता खेळता, वाडी संस्थानच्या ब्राह्मणांची पाणी वापरण्याची शेवडीत पडले. पाच-सहा फूट पाणी असल्यामुळे ल्हानसे मुल ते त्या पाण्यामध्ये बुडून मरण पावले. जिकडे तिकडे बोभाट उठला. ब्राह्मणाच्या विहिरीमध्ये चांभाराचं पोरगं पडलं. पाणी अशुद्ध झालं, पाणी अशुद्ध झालं. त्या वेळी पोरगं कोनाला गेल्याचे दु:ख नाही. एवढे दु:ख ते पाणी अशुद्ध झाल्यांचे त्या ब्राह्मणांना झाले होते. पाण्याला अस्पृशांचा स्पर्श झाल्याचे दु:ख त्यांना झाले होते. बघता बघता ही वार्ता वाडी संस्थानमध्ये संत सखाराम महाराजांकडे गेली. सर्व संतांचा संत समागम त्या ठिकाणी चाललेला होता. संत श्री सखारामजी महाराज, अनंतस्वामी, बोधराज महाराज, उपस्थित सर्व संत मंडळी, वारकरी मंडळी आणि सर्वजण बोरी नदीच्या काठावर आले. ते चांभाराचे पोर मरून पाण्यावर आलेले होते. लोकांनी कसे बसे ते प्रेत बाहेर काढले. चांभाराच्या घरी वार्ता गेली. पोराचे आई-बाप आले. घाय मोकलून रडायला लागले. एकच हाहाकार झाला होता. दु:ख दोन्हीकडे होते. माय-बापाला पोर मेल्याचे दु:ख झाले होते, तर ब्राह्मणांना पाणी अशुद्ध झाल्याचे दु:ख झाले होते. पांडुरंगाने संत श्री बोधराज महाराजांना मनोमन साक्षात्कार दिला, 'बोधराज, हे पोर जीवंत होईल, त्याला जीवंत कर. मलाही या ब्राह्मणांना धडा शिकवायचा आहे. यांनी यापुढे हे पाणी वापरले पाहिजे. ही शेवडी बंद करता कामा नये.' बोधराज महाराजांनी ही वार्ता सखाराम महाराजांना सांगितली, "महाराज, पांडुरंगाचा आदेश आहे, स्पृश-अस्पृश्यता जर मोडायची असेल, तर मुलगा जीवंत होतो आहे! त्यानंतर काय तुम्हाला वेदोक्त, शास्त्रोक्त विधीने ते पाणी शुद्ध करायचे ते तुम्ही करू शकतात." सखाराम महाराजांनी होकार दिला. सखाराम महाराजांनी त्या बाळाच्या अंगावरून तीन वेळा हात फिरवला. आणि त्या बाळाच्या आईला सांगितले, "आई, तुझ्या बाळाला हाक मार." संताची, भगवंताची कृपा झाली. आईने त्या बाळाला हाक मारली, "बाळा उठ, बाळा उठ, बाळा उठ, तिसरी हाक दिल्याबरोबर पोर उठून उभे राहिले! सगळ्यांनी त्या बोरीच्या वाळवंटामध्ये संत श्री सखाराम महाराजांचा जयजयकार केला. संत श्री बोधराज महाराजांचा जयजयकार झाला. ब्राह्मणांनी सांगितल्याप्रमाणे त्या वाडी संस्थानमध्ये पुन्हा ते पाणी वापरायला सुरूवात केली.

बोधराज बाबांनी त्यांच्या शेतामध्ये रब्बीची ज्वारी पेरलेली होती. खानदेशामध्ये तिला दादर म्हणतात. दादरचे पिक पोगीवर आलेले आहे. काही निसवलेले आहे. भरदार पिक दिसते आहे. घरात सर्वांना आनंद झाला आहे. बोधराजांना पत्नी यमाईने सांगितले, "तुम्हाला भजन-कीर्तन जे करायचे असेल, ते शेतावर माळा बांधलेला आहे, तिथे बसा आणि तिथे भगवंताचे भजन करा. या वर्षी पीक चांगले आलेले आहे. सावकाराच्या उणा मोरा कर्ज फिटायचे आहे. ज्याचे त्याचे देणे देऊन कर्ज फिटून जाणार आहे." त्याप्रमाणे बाबांनी उठावे, शेतामध्ये जावे आणि त्या माचीवर बसून पिकाची राखण करावी, पांडुरंगाचा धावा करावा, भजन करावे एकांतामध्ये रममाण व्हावे. हे बाबांचे नित्याचेच काम झाले होते. दादरीचे ते पीक आता हुरड्यावर आले होते. कणसात टच्च दाणे भरलेले आहेत. हुरड्यावर पीक आले असतांना एक दिड-दोनशे लोकांची वारकऱ्यांची दिंडी आली. त्या शेताला लागून असलेल्या रस्त्याने 'ज्ञानबा-तुकाराम, ज्ञानबा-तुकाराम' करत चाललेली होती. वारकऱ्यांची दिंडी पाहून बाबा माचीवरून खाली उतरले. त्यांच्या दर्शनाकरिता ते रस्त्यावर आले. त्यांचे दर्शन घेतले. म्हणाले, 'एवढा करा उपकार, सांगा देवा नमस्कार. माझा देवाला पांडुरंगाला नमस्कार सांगा.' तेवढ्यात त्यांच्यातला एक वारकरी म्हणाला, "बाबा, तुमच्या शेतामध्ये हुरडा खूप सुंदर आला आहे, थोडा देता का खायला?" बाबा वारकऱ्यांना म्हणाले, "तुम्हाला हुरडा खायचा ना, पण मी माझ्या हाताने नाही मोडून देऊ शकत नाही. शेत तुमचे आहे, पीक तुमचे आहे, तुम्हाला हवे तेवढे घ्या. कारण आईसाहेबांनी मला माझ्या पांडुरंगाची शपत घातली आहे. तुम्हाला हवा तेवढा हुरडा घ्या." यमाई दररोज बाबांना शेतात भाकरी द्यायला जात असे. तिने बाबांना ताकीद दिली होती, "बघा, शेतातले एक कणीससुद्धा इकडे तिकडे जायला नको. तुम्हाला तुमच्या विठोबाची शपत!"

दिड-दोनशे वारकरी. एकेकाने दहा-दहा, वीस-वीस हुरडे मोडले. बघता बघता संपूर्ण शेत फस्त करून टाकले. शेतात ज्वारीचे नुसते ताटे उभे राहिलेले होते. शेतात एकही कणीस नाही. गावामध्ये बभरा उठला. बोधल्याबुवा आता दिवानाचा सारा भरू शकत नाही. सात होन सरकारी भरणा करायचा होता, आणि बाबांचे शेत उद्धवस्त झालेले होते. लोकांनी दिवानाकडे तक्रार केली, "आम्ही या वर्षी सारा भरणार नाहीत." दिवानजी म्हणाले, "का बुवा? सरकारी भरणा का भरणार नाहीत?" "दिवानजी, आधी बोधल्याकडून भरणा वसूल करा. त्याचे संपूर्ण शेत उद्धवस्त झालेले आहे. बोधल्या भरणा करू शकत नाही. आणि जर बोधल्याने भरणा केला नाही, तर आम्हीही कुठलाही भरणा करणार नाही." एकमुखाने सर्वजण सांगत होते. इकडे बाबांना चिंता पडली. बाबा गावामध्ये इकडे तिकडे सावकारांकडे व्याजाने पैसे शोधत होते. आजंदे गावात बायजा बाई नावाची एक सावकारीन होती. त्या बाईकडे सरकारी भरणा करायला व्याजाने पैसे मागितले. बाबांचे मधुर बोलणे, बाबांचा मायाळू स्वभाव त्या बाईला पटले खरे. पण गावातल्या खटकुट्यांनी त्या सरकारीन बाईचे कान भरले. पैसे मिळाले नाहीत, बाबा अंत:करणामध्ये खिन्न झाले. इकडे दिवानाने चार शिरस्तेदार बाबांच्या घरापुढे कर वसूलीकरिता बसविले होते. बोधलेबाबांच्या कुटुंबाला नजरकैदेमध्ये टाकले होते. 'जोपर्यंत सात होनांचा सरकारी भरणा होत नाही, तो पर्यंत तुम्हाला कुठेही जाता येणार नाही.' असा दिवानाचा आदेश होता.

बोधलेबाबानी पांडुरंगाचा धावा केला. 'देवा, पांडुरंगा हे काय संकट आले.' भगवान परमात्म्याला बोधलेबाबांची काळजी वाटू लागली, 'माझा भोळा

भक्त, आज त्याच्या घरावर नजरकैद!' भगवंताने आजंद्याच्या विठू महाराचे रूप घेतले आणि सात होन आपल्या कस्यामध्ये घेतल्या. आणि दिवानाच्या दरबारामध्ये हजेरी लावली. जोहार केला. ''जोहार माय-बाप जोहार, तुमचे महारांचा मी महार.'' दिवानजी म्हणाले, ''कोण रे तू, कशाकरता आला?'' पांडुरंग म्हणतात, ''महाराज, मी आजंद्याचा विठू महार. मी आजंदेकर बोधराज पाटलांकडून आलो आहे. त्यांचा जो सरकारी भरणा आहे, तो भरणा करण्याकरता गाव कोतवाल म्हणून तुमच्याकडे आलेलो आहे. हा भरणा घ्या. आणि मला रसीद करून द्या.'' बोधलेबाबांच्या घरावर जागता पहारा आहे. भगवान परमात्म्याने विठू महाराचे रूप घेऊन बाबांचा सरकारी सारा भरणा जमा केलेला आहे. सारा भरल्याची पावती फाडल्याबरोबर, दिवानाने नजरकैदेवरचे शिपाई काढून घेतले होते. दुसऱ्या दिवशी संध्याकाळी बोधलेबाबा घरी परत आले. आईसाहेबांनी सर्व हकीगत सांगितली, ''दिवानजीने त्यांना खूप त्रास दिला होता. पण अचानक संध्याकाळी कसा काय पहारा उठवला हे मात्र आम्हाला माहीत नाही!'' बोधलेबाबांनी सात होन घेतले, आणि दिवानाच्या दरबारात हजर झाले. 'राम कृष्ण हरी' म्हणत दिवानाला नमस्कार केला. ''बोला, काय काम आहे बोधराजजी?'' बाबा म्हणाले, ''दिवानजी, मी सरकारी सारा जमा करण्याकरता आलो आहे. या सात होन घ्या. आणि आपला सरकारी भरणा करुन घ्या.'' दिवानजी खो-खो हसायला लागले. ''आहो बोधराज, तुम्ही काय आमची टिंगल करता काय?'' ''नाही महाराज, टिंगल करण्याचा काय प्रश्न आहे? सरकारी भरणा करणे म्हणजे टिंगल थोडी आहे?'' ''आहो, बोधराज पण तुमचा भरणा तर कालच मिळाला, तुमचा तो विठू गावाचा कोतवाल, तो येऊन भरणा करून रसीद घेऊन गेला आहे. आणि तुम्ही कसे काय भरणा करतात?'' दिवानाने आपल्या जवळची रसीदीची नक्कल बोधराजांना दाखवली, ''ही बघा रसीद, काल विठू महार, तुमचा गावकोतवाल आला, त्याने पैसे दिले. आणि तो पावती फाडून घेऊन गेला.'' बाबांनी भगवान परमात्म्याचा धावा केला. 'देवा पंढरीनाथा अरे, माझ्याकरता तू स्वत: गावकोतवालाचे रूप घेतले! पांडुरंगा धन्य आहे तुला.'

एकदा बोधराजबाबांना वारीला जायचे होते. दुष्काळी परिस्थिती होती. घरात खायला अन्न मिळेना. प्यायला पाणी मिळेना. अशा परिस्थितीमध्ये आषाढी वारी आली. वारीचा नेम चुकवायचा नाही. बोधलेबाबा वर्शीच्या बडगुजर सावकाराकडे गेले. सावकाराला सांगितले, ''सावकारजी, मला दोनशे रूपये द्या, मला आषाढी वारीला जायचे आहे.'' सावकाराने दहा, वीस, तीस, चाळीस आणि पन्नास किलो वजनाचे असे पाच दगड आणून ठेवलेले होते. ''बोधराज, हे दगड पाहिलेत का?'' ''हो पाहिलेत.'' ''मी तुम्हाला दोनशे रूपये देतो, पण दिलेल्या मुदतीत जर पैसे परत आले नाहीत तर मात्र विचार करा. शंभर रूपये घेतले तर हा दहा किलोचा दगड, दोनशे रूपये घेतले तर हा वीस किलोचा दगड, तीनशे रूपये घेतले तर हा तीस किलोचा दगड, आणि पाचशे रूपये घेतले तर हा पन्नास किलोचा दगड डोक्यावर घेऊन तुम्हाला सर्व वर्शी गावामध्ये फिरावे लागेल. आणि हो, दिलेल्या पैशाचे व्याज दंडासहित भरावे लागेल. आणि व्याजाच्या दंड चक्रवाढ पद्धतीने वसूल केला जाईल. तुम्हाला मंजूर असेल, तर मी तुम्हाला पैसे देतो.'' बाबांनी सांगितले, ''मला मंजूर आहे, मी माझ्या पांडुरंगाकरिता वाटेल ते करायला तयार आहे.'' सावकाराने मुदत लिहून घेतली. दोनशे रूपये बाबांच्या स्वाधीन केले. बोधलेबाबांची आषाढी वारी अगदी सुखरूप पार पडली होती. बाबा घरी परत आले. दिवसामागून दिवस जात होते. सावकाराचा वायदा भरत आला होता. वारीसाठी घेतलेल्या पैशाची मुदत संपत आली होती. ठरलेल्या वेळेमध्ये जर पैसे गेले नाहीत, तर सावकार वीस किलोचा दगड डोक्यावर घेऊन संपूर्ण वर्शी गावामध्ये फिरवणार होता. पुन्हा चक्रवाढ पद्धतीने व्याजाचे पैसे वसूल करणार होता. काय करावे? बाबांचे चित्त लागेना. सावकाराचे पैसे वेळेवर मिळेनात. हातामध्ये पैसा नाही. बाबा इकडे तिकडे पैशांची व्यवस्था करायला लागले. काही केल्या पैसे मिळत नव्हते. दुसऱ्या दिवशी सकाळी दहा वाजता सावकाराने दिलेली मुदत संपणार होती. सावकाराचा बोजा वाढत होता. आणि पुन्हा शिक्षा होणार आहे. बोधलेबाबा चिंता करत होते. आणि हीच वेळ भगवान परमात्म्याने बरोबर साधली होती. 'हातात घेतली काठी, नेसला मलीन चिंगोटी। करी जोहार दरबारात, झाला महार पंढरीनाथ ।।'

विठ्ठलाने पुन्हा विठू महाराचे, गावकोतवालाचे रूप घेतले. दोनशे रूपयाच्या सोन्याच्या होन धोतराच्या कस्यामध्ये भरल्या. आणि भगवान परमात्मा वर्शीच्या बडगुजर सावकाराच्या दुकानामध्ये जाऊन हजर झाले. बडगुजर सावकाराने दरडावून विचारले, ''ये, कोण रे तू? कशा करता आलास?'' ''महाराज, विठू महार म्हणतात मला. मी आजंद्याचा गावकोतवाल. बोधराज पाटलांनी तुमच्याकडून जे दोनशे रूपये कर्ज घेतले होते, ते परत देण्याकरता मला पाठवले आहे. ते कामाने बाहेरगावाला गेलेले आहेत. उद्या दहा वाजेपर्यंत तुमची मुदत संपते आहे, म्हणून मी आलो आहे.'' सावकार सांगत होता, ''पैसे पूर्ण आणले आहेत का? व्याजाचे आणले आहेत का? नसतील आणले तर अजून एक दिवस बाकी आहे नीट विचार कर.'' ''नाही मालक, मी पैसे देतो, ते मोजून घ्या जी.'' गावकोतवालाच्या रूपातल्या पांडुरंगाने आपल्या कमरेचा कस्सा सोडला. सावकारापुढे ओतला. 'खणखणा ओतील्या मोहरा।' सावकार म्हणाला, ''ये विठ्या, अरे या एवढ्या पैशाने माझे पैसे फिटणार नाहीत. पैसे कमी आहेत. मी कमी पैसे घेणार नाही. माझी तशी रीत नाही.'' भगवान परमात्मा हात जोडून सांगतात, ''सावकारजी, आधी हिशोब करा. कमी भरले तर दुसरा कस्सा सोडून देतो. अजून आहेत पैसे माझ्याकडे, तुम्ही चिंता करू नका. तुम्ही जेवढे दिले होते, तेवढे व्याजासह मोजून घ्या जी.'' सावकाराने आपले दिलेले मुद्दल आणि व्याज मोजून घेतले, तरी अर्ध्या सुवर्ण मोहरा शिल्लक राहिल्या होत्या! सावकार विचार करू लागला, 'अरे, मी पाहिले त्या वेळेला पैसे कमी दिसत होते? आपले पैसे घेऊन अर्धे कसे काय उरले?' विठू गावकोतवालाने ते उरलेले पैसे धोतराच्या कस्यामध्ये परत भरून घेतले. सावकाराने पैसे मिळाल्याची पावती लिहून सही करून दिली. विठू महाराने पुन्हा जोहार केला. आणि परमात्मा पांडुरंग तिथून निघाले. इकडे बोधलेबाबा संध्याकाळी आजंद्याला घरी आले. रात्रभर त्यांचा डोळ्याला डोळा लागेना. सावकार उद्या वीस किलोचा दगड डोक्यावर देऊन वर्शी गावाला आपल्याला फिरवल्या वाचून सोडणार नाही. पण असो. माझ्या भगवंताकरिता, 'देवा तुझ्यासाठी सोडली रे लाज. मी तुझ्याकरता वाटेल ते करायला तयार आहे.'

बोधले महाराजांनी दत्ताणे गावचे दोन जमीनदार दिले होते. त्या जमीनदारांना घ्यायला गेले. पण तेही घरी भेटले नाहीत. बोधलेबाबा एकटेच वर्शीला गेले. सावकाराच्या घरी ओसरीवर जाऊन हजर झाले. सावकाराला नमस्कार केला. सावकाराने बाबांना नमस्कार केला. आणि विचारले, ''आहो बोधराज पाटील, पुन्हा काय येणे केले?'' सावकार, ''पुन्हा कसे काय विचारताहेत? आहो, तुमच्याकडून मी आषाढी वारीकरिता कर्ज घेतले होते. ते कर्ज परत देण्याकरता आलेलो आहे.'' सावकार म्हणाला, ''ठीक आहे, आहो पण तुमचा तो गावकोतवाल विठू महार कालच येऊन व्याजासह संपूर्ण मुद्दल देऊन गेला. आणि पावती घेऊन गेला. तुमचा भरणा मला मिळालेला आहे. त्याबाबत माझी काही तक्रार नाही.'' सावकाराने बोधलेबाबांना पैसे भरणा केल्याची पावती दाखविली. पांडुरंगाने गावकोतवालाचे विठू महाराचे रूप घेतले. आणि बोधलेबाबाला सावकाराच्या ऋणातून मुक्त केले. बोधलेबाबा धन्य झाले होते.

(खानदेशातील या संत बोधराज महाराजांचे चरित्र आजपर्यंत कुठेही उपलब्ध नाही. परंतु आजंदे गाव व परिसरात त्यांच्या चरित्र आणि चमत्कारांविषयी ज्या काही आख्यायिका व दंतकथा अहिराणी बोलीत मौखिक स्वरूपामध्ये लोकसमुदायात उपलब्ध आहेत, त्या संकलित करून त्या आधारे प्रस्तुत अभ्यासकाने संत बोधराज महाराजांची लोककथा सिध्द करण्याचा नम्र प्रयत्न केला आहे.)





# भक्ती परंपरेतील स्त्रीसाहित्याचे योगदान

डॉ. गीता सुनिल येर्लेकर, मराठी विभाग, गोवा विद्यापीठ, गोवा

CONTEMPORARY RESEARCH IN INDIA ISSN 2231 - 2137
Received: 12/01/2018 | Edited: 20/01/2018 | Accepted & Published: 03/03/2018

'संतसाहित्य बहुपरिमाणात्मक असल्याने रसिकमनाला ते वेगवेगळ्या कारणांनी भावते. कोणाला ते धार्मिक दृष्टीने पूज्य वाटते तर कोणाला नैतिक सदाचाराच्या शिकवणुकीमुळे मान्य होते. कोणाला त्यातील सौंदर्यसंवेदनेमुळे ते प्रिय होते. अशा परस्पर भिन्न अपेक्षा संतसाहित्य पुरे करते. आपल्या काळाशी त्याला समजेल अशा भाषेत बोलत असतानाच त्याने भविष्यकाळाशी संवाद करण्याची आपली प्रतिसादक्षमता टिकवून ठेवली आहे. त्याने आनंद देऊन आपल्या जीवनजाणिवांना प्रगल्भ केले आहे. त्याचप्रमाणे मराठी परंपरेतील निरनिराळ्या प्रतिभावंत मनांना स्पंदित केले आहे. मराठी जीवन, वाङ्मय आणि संस्कृती यावर त्याचा एक स्पष्ट ठसा उमटलेला आहे. संतांचे साहित्य हे जसे आपले साहित्यधन आहे तसे ते आपले सांस्कृतिक संचितही आहे. ते गतकालाप्रमाणे समकालातही मौल्यवान आहे आणि भविष्यातही त्याचे मूल्य वाढतच जाणार आहे.'

– र. बा. मंचरकर

१२ व्या शतकापासून १७ व्या शतकापर्यंत भक्ती परंपरेतील स्त्रीसाहित्याची समृद्ध परंपरा सांगता येते. आद्य कवयित्री महदंबापासून वेणाबाईपर्यंत बऱ्याच संतकवयित्री दिसून येतात. शोधनिबंधासाठी वारकरी संप्रदायातील संतकवयित्रींचाच आधार घेतला असल्यामुळे या परंपरेतील संतकवयित्रींच्या रचनांचा विचार केला आहे. तत्कालीन स्त्रियांचे समाजातील स्थान, स्त्रीला घालून दिलेले संकेत पाहता या संतकवयित्रींनी आपल्या रचनांमधून आपल्या जगण्याचा वास्तवाच्या आधारे वेध घेतला आहे. स्त्री म्हणून स्वतःकडे आणि समाजाकडे पाहणे यातून तिची स्वतंत्र दृष्टी प्रतीत होते. संतकवयित्रींच्या लेखनातील अनेकविध कंगोरे स्पष्ट करून भक्ती परंपरेला त्यांनी दिलेले योगदान तपासणे, कोणत्या नव्या जाणिवांना हे काव्य स्वतःत सामावून घेऊ पाहत होते जेणेकरून आजच्या आधुनिक काळातही त्यातील संदर्भ तितकेच महत्त्वपूर्ण ठरतात हे समजून घेणे या उद्देशाने या विषयाची निवड केली आहे.

'शास्त्रप्रामाण्याला व जातिव्यवस्थेला धक्का न लावता वारकरी पंथाने स्त्रीशुद्रादिकांना आत्मविकासाचा मार्ग खुला करून दिला. पूर्वकर्मानुसार प्राप्त झालेल्या बाह्य परिस्थितीत आपणास यत्किंचितही बदल करता आला नाही तरी हताश होण्याचे कारण नाही. कोणत्याही जातीतील मनुष्याला भक्तिपंथाच्या व्दारा आध्यात्मिक उन्नती साधता येईल, नैतिक सामर्थ्य वाढविता येईल प्रापंचिक दुःखावर मात करता येईल, असा अगदी खालच्या थरातील लोकांतही या चळवळीने विश्वास निर्माण केला.'[1] या भक्तिपरंपरेत स्त्रियांचेही योगदान तितकेच महत्त्वपूर्ण ठरते. स्त्रीविषयक नवे भान आणि तिच्या आत्मिक उन्नतीचे दर्शन, स्त्री असूनही पारंपरिक चौकटीत जगत असतानाही आपले म्हणणे मांडण्याची ताकद, प्रापंचिक जगण्यातील अनुभवांना व्यक्त करताना त्यातील दुःखावर मात करत परमार्थाचे घडविलेले दर्शन हे संदर्भ संतकवयित्रींच्या कार्य आणि कर्तृत्वाचा आढावा घेता महत्त्वपूर्ण ठरतात.

आपल्या साध्या आणि सहज रचनांमधून परमार्थाचे ज्ञान, विठ्ठलाशी जोडलेपण, नामाचा महिमा, संतांचे संदर्भ या विशेषांबरोबरच या सगळ्या परंपरेकडे स्त्रीच्या नजरेतून पाहत असताना निश्चित असे वेगळे अनुभवविश्व या रचनांमधून चितारले गेले. स्त्रीच्या लौकिक जगण्याला कुठेही बाजूला न करता स्त्री काव्यप्रवाहाला समृद्ध करण्याचा प्रयत्न या परंपरेने केला हे तिचे महत्त्वाचे योगदान म्हणून नोंदवता येते. एकुणच मराठी साहित्य अक्षर साहित्य आहे. प्रत्येक काळाशी त्याचे संवादी असणे हेच त्याचे विशेष आहे. संत साहित्याची लक्षणे सांगत असताना र. बा. मंचरकर म्हणतात, 'विठ्ठल हे उपास्यदैवत, नामस्मरण हे साधन, व्यक्तिमत्त्वाची शुद्धता व गुणसंपन्नता, आत्मोद्धाराबरोबर लोकोद्धाराची आस ही लक्षणे आहेत.'[2] ही सगळी लक्षणे संतकवयित्रींच्या काव्याला लागू पडतात पण त्याचबरोबर आजवर स्त्रीविषयक जाणिवांकडे झालेले दुर्लक्ष याची उणीवही हे काव्य भरून काढते.

सर्वसामान्य स्त्रियांचे जगणे या संतकवयित्री जगत होत्या. स्त्री म्हणून जे वास्तव इतर स्त्रियांना भोगावे लागले तेच वास्तव संतकवयित्रीही भोगत होत्या, तरीही बाईपणाच्या पारंपरिक चौकटीत स्वतःच्या मनाला कोंडून न ठेवता चौकटीचे निर्बंध स्वतःपुरते तरी